नि.दि.दावा.क्र. ५१/२०२३
संजिवकुमार वि. विरेंद्र
निशाणी क्र. १९६

प्रतिवादी क्र.५ तर्फे साक्षीदार क्र.१ विशाखा विनायक बनकर -
मी शपथेवर सांगतो की,

<u>साक्षीदाराचा सर तपास प्रतिवादी क्र**.** ५ तर्फे विद्वान विधीज्ञ श्री**.**गुप्ता यांच्यातर्फे सुरु**-**</u>

माझ्या शपथपत्रातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो मला वाचुन दाखविण्यात आला आणि मराठी भाषेत समजावुन सांगण्यात आला. त्यावर माझी सही आहे.

२. मी माझ्या पुराव्याकामी यापुर्वी कागदपत्र दाखल केले आहे. सदर कागदपत्रांना, प्रतिवादी क्र.१ याच्या साक्षीमध्ये निशानी क्रमांक देण्यात आलेले आहेत. आज रोजी मी दावा मिळकतीचा सातबारा उतारा दाखल केलेला आहे. सदर सातबारा उता-यास नि.क्र.२०४ देण्यात येत आहे. वादीच्या वकीलांनी आक्षेप नोंदविला की प्रतिवादी क्र.१ हा मयत झाल्यामुळे त्याचा उलटतपास पुर्ण झालेला नाही. त्यामुळे त्याचा पुरावा हा विचारात घेता येणार नाही.
सरतपास पुर्ण.

<u>उलटतपास वादी तर्फे त्यांचे सुविद्य विधीज्ञ श्री**.** हरिणखडे यांद्वारे**-**</u>

३. माझे शिक्षण पोष्ट ग्रॅडयुएशन आहे. माझे राज्यघटना या विषयात पोष्ट ग्रॅडयुएट आहे. मी माझ्या लेखी कैफियतीवर वाचुन आणि समजुन सहया केल्या आहेत. मी माझ्या शपथपत्रावर वाचुन समजुन सहया केल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की आज रोजी मी प्रतिवादी क्र.५ म्हणुन साक्ष देत आहे. माझ्या लेखी कैफियतीमध्ये दिनांक ०९/०५/१९९६ च्या खरेदीपत्राचा उल्लेख आहे किंवा नाही हे मी सांगु शकत नाही. प्रस्तुत प्रकरणाबददल, २०१७ पासुन मला पुर्ण माहिती आहे. माझ्या शपथपत्रातील पान क्र.२ ओळ क्र.१० पासुन ते ओळ क्र.१९ पर्यंत म्हणजेच कंसांकित <u>भाग 'ए'</u> हा माझ्या लेखी कैफियतीमध्ये नाही. साक्षीदाराला त्याच्या शपथपत्रातील कंसांकित भाग 'बी' हा वाचुन दाखविण्यात आला. साक्षीदाराने सांगितले की सदर कंसांकित <u>भाग 'बी'</u> हा त्यांच्या लेखी कैफियतीमध्ये नाही. साक्षीदाराला त्याच्या शपथपत्रातील कंसांकित भाग "सी" हा वाचुन दाखविण्यात आला. साक्षीदाराने सांगितले की सदर कंसांकित <u>भाग 'सी'</u> हा त्यांच्या लेखी कैफियतीमध्ये नाही. साक्षीदाराला त्याच्या शपथपत्रातील कंसांकित भाग 'डी' हा वाचुन दाखविण्यात आला. साक्षीदाराने सांगितले की सदर कंसांकित <u>भाग 'डी'</u> हा त्यांच्या लेखी कैफियतीमध्ये नाही. साक्षीदाराला त्याच्या शपथपत्रातील कंसांकित भाग 'इ' हा वाचुन दाखविण्यात आला. साक्षीदाराने सांगितले की सदर

कंसांकित <u>भाग 'इ'</u> हा त्यांच्या लेखी कैफियतीमध्ये नाही. साक्षीदाराला त्याच्या शपथपत्रातील कंसांकित भाग 'एफ' हा वाचुन दाखविण्यात आला. साक्षीदाराने सांगितले की सदर कंसांकित <u>भाग 'एफ'</u> हा त्यांच्या लेखी कैफियतीमध्ये नाही. साक्षीदाराला त्याच्या शपथपत्रातील कंसांकित भाग 'जी' हा वाचुन दाखविण्यात आला. साक्षीदाराने सांगितले की सदर कंसांकित <u>भाग 'जी'</u> हा त्यांच्या लेखी कैफियतीमध्ये नाही. साक्षीदाराला त्याच्या शपथपत्रातील कंसांकित भाग 'एच' हा वाचुन दाखविण्यात आला. साक्षीदाराने सांगितले की सदर कंसांकित <u>भाग 'एच'</u> हा त्यांच्या लेखी कैफियतीमध्ये नाही. साक्षीदाराला त्याच्या शपथपत्रातील कंसांकित भाग 'आय' हा वाचुन दाखविण्यात आला. साक्षीदाराने सांगितले की सदर कंसांकित <u>भाग 'आय'</u> हा त्यांच्या लेखी कैफियतीमध्ये नाही. साक्षीदाराला त्याच्या शपथपत्रातील कंसांकित भाग 'जे' हा वाचुन दाखविण्यात आला. साक्षीदाराने सांगितले की सदर कंसांकित <u>भाग 'जे'</u> हा त्यांच्या लेखी कैफियतीमध्ये नाही. मी माझ्या लेखी कैफियतीसोबत माझा प्रतिदावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की मी नागपुर येथे राहतो. हे म्हणणे खरे आहे की माझा भाउ विरेंद्र हा २६ एप्रिल २०२५ रोजी मयत झाले. आम्ही एकुण पाच भाउबहिण होतो. त्यामध्ये दोन भाउ आणि तीन बहिणी होत्या. माझा भाउ विनोद हा सन २०२२ मध्ये मयत झाला. हे म्हणणे खरे नाही की विनोदच्या बायकोसोबत मी शितलवाडी येथे राहते. हे म्हणणे खरे आहे की विरेंद्र आणि विनोद दोघांची घरे वेगवेगळे आहेत. माझे घर देखिल वेगळे आहे. विरेंद्र याला एक मुलगा आणि एक मुलगी आहे. हे म्हणणे खरे आहे की ८/०५/२०२५ रोजी धाब्याच्या मागच्या जागेवर आम्ही तारेचे कुंपन केले आहे. हे मला माहित नाही की मागची जागा ही २७ ते २८ हजार चौरस फुट आहे. हे म्हणणे खरे आहे की सर्वे नं.५६/२/अ ही विरेंद्र यांची स्वअर्जित मिळकत होती. हे म्हणणे खरे आहे की मी आणि आमचे भाउ वेगवेगळे राहत होतो. हे म्हणणे खरे नाही की ज्या जागेवर तारेचे कुंपन घातले त्या जागेवर विरेंद्रचा कब्जा होता. हे म्हणणे खरे आहे की धाब्याची जागा ही वादीच्या कब्ज्यामध्ये आहे. हे म्हणणे खरे आहे की धाब्याची जागा ही सर्वे नं.५६/२/अ चा भाग आहे. हे म्हणणे खरे आहे की दिनांक ९/०१/२०२५ सर्वे नं.५६/२/अ चे बक्षिसपत्र माझ्या नावाने झालेले आहे. बक्षिसपत्राची प्रत मी याकामी दाखल केली नाही. आवश्यकत असेल तर मी बक्षिसपत्राची प्रत मी दाखल करु शकते. बक्षिसपत्र माझ्या वकीलांनी सांगितले तर मी पुढच्या तारखेला दाखल करु शकते.

प्रश्न- बक्षिसपत्राच्या दिवशी तुम्हाला कब्जा मिळाला होता का ?

उत्तर माझा पुर्वीपासुनच कब्जा होता.

हे म्हणणे खरे नाही की विरेंद्रचा कधीही दावा मिळकतीवर कब्जा नव्हता. मी वादीला वैयक्तीक रित्या ओळखत नाही. वादीच्या वडीलांना देखिल मी ओळखत नव्हते. साक्षीदाराला त्याच्या शपथपत्रातील कंसांकित भाग 'के' हा वाचुन दाखविण्यात आला. साक्षीदाराने सांगितले की सदर कंसांकित <u>भाग 'के'</u>

हा त्यांच्या लेखी कैफियतीमध्ये नाही. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकतीवरील बांधकाम हे २६ ते ३० वर्षे जुने आहे. बांधकाम किती जुणे आहे हे मी अंदाजे सांगु शकत नाही.

४. साक्षीदाराला फोटोग्राफ्स दाखविण्यात आले. साक्षीदाराने सांगितले की सदर फोटोग्राफ्स हे दावा मिळकतीचे आहेत. सदर फोटोग्राफ्सला नि.क्र. २०५ ते २१९ देण्यात येत आहे. हे मी सांगु शकत नाही की फोटोमधील बांधकाम हे खुप जुने आहे.

५. हे म्हणणे खरे नाही की दिनांक ९/०१/२०२५ ला मला दावामिळकत आणि उर्वरित जागेचा कब्जा मिळाला नाही. हे म्हणणे खरे नाही की शपथपत्रातील कलम ११ माधील मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की सन १९९९ पासुन, वादी आणि वादीचे वडील धाबा हा दावामिळकतीमध्ये चालवत आहेत. हे म्हणणे खरे नाही की सन १९९९ पासुन ते दावा दाखल करेपर्यंत, माझ्या कोणत्याही भावाने वादीला अडथळा अथवा विचारणा केली नाही. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकतीचे बांधकाम हे वादी आणि वादीच्या वडीलांनी केले आहे. हे म्हणणे खरे नाही की बांधकाम हे २५ ते ३० वर्षे जुने आहे. हे म्हणणे खरे नाही की वादीने मला शिवीगाळ अथवा जिवे मारण्याची धमकी दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की वादीने विरेंद्र अथवा त्याच्या कुटुंबाला शिवीगाळ अथवा जिवे मारण्याची धमकी दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की सन १९९९ पासुन माझे भाउ दावामिळकतीमध्ये जा-ये करत होते. साक्षीदार स्वतःहुन सांगते की दावा मिळकत घेतल्यापासुनच जा-ये चालु होते. मी या प्रकरणामध्ये जातीचा दाखला दाखल केलेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की माझ्या शपथपत्रातील कलम १३ मधील मजकुर हा लेखी कैफियतीमध्ये नाही. हे म्हणणे खरे नाही की आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

माझे समक्ष

SARODE SANDEEP MARUTI

I.A.R. No. 106-2005
Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2026.03.24 17:23:32 +0530

दिनांक २३.०३.२०२६.
रामटेक

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

वि.दि.दावा.क्र. ७४/२०२५
जगदीश वि. रजिष्ट्रार
निशाणी क्र. १२

वादीतर्फे साक्षीदार क्र.२ पुष्पा जगदीश सोनवने -
मी शपथेवर सांगतो की,

<u>साक्षीदाराचा सर तपास वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.ए.डी.भेदरे यांच्यातर्फे सुरु-</u>

माझ्या शपथपत्रातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो मला वाचुन दाखविण्यात आला आणि मराठी भाषेत समजावुन सांगण्यात आला. त्यावर माझी सही आहे.

२. मी माझ्या पुराव्याकामी आधार कार्ड इत्यादी दाखल केलेले आहे. सदर दस्तांना अनुक्रमे नि.क्र. १३ देण्यात येत आहे.

सरतपास पुर्ण.

उलटतपास प्रतिवादी तर्फे-

प्रतिवादी गैरहजर-सबब उलटतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
माझे समक्ष

दिनांक ११.०३.२०२६.
रामटेक

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

वि.दि.दावा.क्र. ७४/२०२५
जगदीश वि. रजिष्ट्रार
निशाणी क्र. १४

वादीतर्फे साक्षीदार क्र.३ मनोज तुकाराम बोरीकर -
मी शपथेवर सांगतो की,

साक्षीदाराचा सर तपास वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.ए.डी.भेदरे यांच्यातर्फे सुरु-

माझ्या शपथपत्रातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो मला वाचुन दाखविण्यात आला आणि मराठी भाषेत समजावुन सांगण्यात आला. त्यावर माझी सही आहे.

२. मी माझ्या पुराव्याकामी आधार कार्ड इत्यादी दाखल केलेले आहे. सदर दस्तांना अनुक्रमे नि.क्र. १५ देण्यात येत आहे.

सरतपास पुर्ण.

उलटतपास प्रतिवादी तर्फे-

प्रतिवादी गैरहजर-सबब उलटतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
माझे समक्ष

दिनांक ११.०३.२०२६.
रामटेक

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

वि.दि.दावा.क्र. ७४/२०२५
जगदीश वि. रजिष्ट्रार
निशाणी क्र. १६

वादीतर्फे साक्षीदार क्र.४ करिष्मा मनोज बोरीकर -
मी शपथेवर सांगतो की,

<u>साक्षीदाराचा सर तपास वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.ए.डी.भेदरे यांच्यातर्फे सुरु-</u>

माझ्या शपथपत्रातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो मला वाचुन दाखविण्यात आला आणि मराठी भाषेत समजावुन सांगण्यात आला. त्यावर माझी सही आहे.

२. मी माझ्या पुराव्याकामी आधार कार्ड इत्यादी दाखल केलेले आहे. सदर दस्तांना अनुक्रमे नि.क्र. १७ देण्यात येत आहे.

सरतपास पुर्ण.

उलटतपास प्रतिवादी तर्फे-

प्रतिवादी गैरहजर-सबब उलटतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
माझे समक्ष

दिनांक ११.०३.२०२६.
रामटेक

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : R. J. khobragade (Gr.-II)